# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०२.०७.२०२६ गुरुवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला आजीवन कारावासाची शिक्षा :—**

दिनांक ०३.०७.२०२६ रोजी मा. मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपुर, श्री. शेखर सी. मुनघाटे साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ५८१/२०२२ मधील, पोलीस ठाणे बजाजनगर येथील अप. क्र. १७८/२०२२ कलम ३०७, ३०२ भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपी जाहीद खान याकुब खान वय ४० वर्षे रा. प्लॉट नं. १२८, श्रध्दानंद पेठ, दक्षिण अंबाझरी मार्ग, बजाजनगर, नागपूर याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ३०२ भादंवि कायद्यान्वये आजीवन कारावासाची शिक्षा व ५००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महिने अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक ०१.०६.२०२२ चे ००.३० वा. चे सुमारास, फिर्यादी यांचे सर्व्हेंट क्वॉर्टरला राहणारा वर नमुद आरोपी नोकराने त्याचेसोबत लिव्ह इन रिलेशनशीप मध्ये राहणारी महिला नामे प्रिया अजाबराव घोडेस्वार वय ४० वर्ष हिचेसोबत झालेल्या भांडणात तिला जिवे ठार मारण्याचे उद्येशाने तिचे डोक्यावर घरगुती लोखंडी तव्याने मारुन गंभीर जखमी केले. गंभीर जखमी यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक ०४.०६.२०२२ चे २३.५५ वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले होते. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक ०१.०६.२०२२ रोजी ०८.१५ वा. अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी सपोनि. संदीप मिश्रा यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती आसावरी पळसोदकर यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री बन्सोड यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. मंगेश डवरे, पोअं मुकेश एंचीलवार यांनी काम पाहिले.

**(कामगिरी)**

**गुन्हेशाखा घरफोडी विरोधी पथकाची कामगिरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०२.०७.२०२६ चे १७.१५ वा. ते १९.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा घरफोडी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, अन्न सुरक्षा अधिकारी यांचेसह पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, प्लॉट नं. १६५, इंगोले नगर, नागपूर येथे राहणारा ईसम नामे जतीन जयप्रकाश शाहु वय २५ वर्षे याचे राहते घरी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्याचे घरात शासनाने प्रतिबंधीत केलेला वेगवेगळ्या कंपनीचा वेगवेगळ्या फ्लेवरचा तंबाखु, पानमसाला व ईतर तंबाखुजन्य पदार्थ असा मुद्देमाल मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ एकुण किंमती ३१,६८०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता शासनाने प्रतिबंधीत केलेले तंबाखुजन्य पदार्थ हे बेकायदेशीर व अवैधरित्या विक्रीकरीता साठा करून बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीविरूध्द फिर्यादी अन्न सुरक्षा

अधिकारी किरणा रंगास्वामी गेडाम, वय ५० वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे कलम १२३,२२३,२७४,२७५ भा.न्या.सं. सहकलम २६(२)(१),२६(२)(iv),२७(३)(d),२७(३)(e),३०(२)(a),३(१)(iv)(zz),५९ अन्न सुरक्षा मानके अधिनियम २००६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी नागपूर शहरचे, मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नागरे पाटील, मा. सह. पोलीस आयुक्त श्री. नविनचंद्र रेड्डी, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल, मा. सहा. पोलीस आयुक्त (अति. कार्य. गुन्हेशाखा) श्री. शिवप्रसाद पारवे यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दिलीप चंदन व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे पाचपावली :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०२.०७.२०२६ चे २२.१५ वा. ते दिनांक ०३.०७.२०२६ चे ०३.१५ वा. चे दरम्यान, पाचपावली पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना पोलीस नियंत्रण कक्षाद्वारे माहिती मिळाली की, लष्करीबाग परिसरातील क्रांती चौक जवळ एक इसम तलवार बाळगून फिरत आहे. अशा माहितीवरुन नमुद ठिकाणी जावुन परिसरात शोध घेतला असता, धार्मिक शासकीय धान्याचे दुकानाचे शेजारी सार्वजनिक ठिकाणी अंधारात प्राप्त वर्णनाचा इसम संशयीतरित्या हालचाली करतांना दिसून आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव यश रोशन बन्सोड, वय २० वर्षे, रा. गल्ली क्र. २, लष्करीबाग, पाचपावली, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक लोखंडी तलवार कि. ३००/—रू. ची मिळून आल्याने जप्त करण्यात आली.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने तलवार बाळगून समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे पाचपावली येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे अंबाझरी</u>:—** कु. डिंपल लिलाधर पराये वय १९ वर्षे रा. रामनगर, तेलंगखेडी दर्गाहजवळ, संतोष परिहार यांचे घरी किरायाने, अंबाझरी, नागपूर ही दिनांक ३०.०६.२०२६ चे १६.४५ वा. पासून पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतील राहते घरी कोणाला काही न सांगता कुठेतरी निघून गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ३ इंच,

डोक्याचे केस काळे, डोळे—काळे, अंगात—काळया रंगाचा गुलाबी व पांढरे ठिपके असलेला फ्रॉक व काळया रंगाची लॅगीन घातलेली असुन पायात ग्रे रंगाचे शुज घातलेले आहेत. भाषा—मराठी/हिंदी बोलते. ओळखचिन्ह—डावे हाताचे मनगटाला काळया रंगाचा धागा बांधलेला आहे.

**२) पोलीस ठाणे कोतवाली:—** विघ्नेश अजय बिलसे वय ३१ वर्षे रा. वाकर रोड, मुंकुदराज लेन, महाल, नागपूर हे दिनांक १९.०६.२०२६ रोजी पासून पोलीस ठाणे कोतवाली हद्दीतील राहते घरुन कोणाला काही न सांगता कुठेतरी निघून गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांब, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ८ इंच, डोक्याचे केस—काळे, अंगात—निळया रंगाचा शर्ट व निळया रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा—मराठी/हिंदी बोलतात.

**३) पोलीस ठाणे नवीन कामठी:—** सौ. पलक अनिकेत शेंडे वय २० वर्षे रा. रमानगर, रेल्वे फाटक जवळ, कामठी, नागपूर हया दिनांक २२.०६.२०२६ चे १४.३० वा. चे सुमारास पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीतील राहते घरी कोणाला काही न सांगता कुठेतरी निघून गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ५ इंच, डोक्याचे केस—काळे, अंगात—निळया रंगाची कुर्ता व पांढरी लॅगीन घातलेली आहे. भाषा—मराठी/हिंदी बोलतात.


कु. डिंपल


विघ्नेश


सौ. पलक

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १२ वे प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०३३३१/ २००९ | कलम ८२ सीआरपीसी | केतन भिमराव पाटील रा. बाभुळबन, बंडू रामटेकेचे घराजवळ, गरोबा मैदान नागपुर. | २९.०७.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**